भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुसार)

जा.क्र.२२८/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २८/०३/२०१७

१) अल्पवयीन मुलीला फुस लावुन पळवुन नेल्याने गुन्हा नोंद . :-

दिनांक २७/०३/२०१७ चे ०७.३० वा. दरम्यान यातील फिर्यादीची मुलगी वय १७ वर्ष १० महिने ९ दिवस ही कॉलेज मध्ये तीची महान बहिन कु. सिम्रा हिला माझे पोट दुखत आहे मी घरी जाते तु दुसऱ्याच्या सायकलने घरी येशील असे म्हणुन कॉलेज मधुन निघुन गेली परंतु घरी परत आली नाही.तीचा गावात व नातेवाहीकात शोध घेतला असता व ती शिकत असलेल्या कॉलेज मध्ये आज पर्यत शोध घेतला असता मिळुन न आल्याने तीला कोणीतरी अज्ञात ईसमाने फुस लावुन पळवुन नेले असावे अशी फिर्यादी सौ. पुष्पा भागचरण कांबळे वय ३९ वर्ष रा. सेलोटी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३६३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. ऊईके पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत.

२) कलेक्षन कापड दुकानाचे कॉऊंटरवरून अनोळखी महिलेने मोबाईल चोरी केल्याने गुन्हा नोंद . :-

दिनांक २७/०३/२०१७ चे १९.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी आपल्या जवळील जिओनी कंपनीचा मोबाईल किंमती १२०००/रू. चा रूची साडी कलेक्षन कापड दुकानाचे कॉऊंटरवर ठेवुन अनोळखी महिलेला ब्लाऊज पिस विकत दिले त्या दरम्यान अनोळखी महिलेने मोबाईल चोरून नेल्याने फिर्यादी सुनिता घनश्याम बलभदरे वय ३९ वर्ष रा. लक्ष्मी नगर खात रोड भंडारा यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे ३८० भादवि. चा गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोना. गुरव पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहे.

३) आमरोडवर दारू पिऊन दारूच्या नशेत वाहन चालवितांना मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :-

दिनांक २७/०३/२०१७ चे १७.००ते १७.३० वा. दरम्यान यातील आरोपी चालकाने आपले ताब्यातील वाहन आमरोडवर दारू पिऊन दारूचे नशेत चालवितांना मिळुन आल्याने त्याचे ब्रिथ अल्कोहल ॲनालायझर मशिन व्दारे चेक केले असता अल्काहलचे प्रमान मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोना बोंद्रे वानिशा यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे १८५(१) मोवाका. चा गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोना. साबळे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहे.

४) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :-

दिनांक २७/०३/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली ८६ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी ०२, तीन सिटर वाहनांवरती ०७ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ७७ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

28.3

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.